# काव्यकुंज



## निरोपाचे गीत

निरोप आम्ही तुम्हास देतो हाची आनंदाने।
सुख सौख्याचे आयुष्यात हे बहरु दे चांदणे।।१।।

मन:शांती तुम्हा आरोग्य लाभो दीर्घायुष्य हे।
परिश्रम बहुतचि केले,घ्यावी विश्रांती हे।।२।।

कोण कोठुनी येतो आपण सारेचि एकत्र।
हसत मुखाने राहुनि नित्य बनलोही मित्र।।३।।

कटु आठवण विसरुन जाऊ ठेवुनि आनंद।
नित्य जीवनी लाभो तुम्हा हाचि परमानंद।।४।।

भाषण नाही चार शब्द हे माझे आपुलकीचे।
गोड मानुनी घ्यावे सारे बोलहि कवनाचे।।५।।

श्री.भा.शं.सप्रे
निम्नस्तर लिपिक(इंधन कक्ष)
मुख्यालय

## हासरे घर

स्वप्न नव्हते पाहिले कधी
टुमदार बंगल्याचे
हवे होते मात्र मला
एक घर हक्काचे।।
घरात आहे आमुच्या घरपण
नव्हते नुसत्या भिंती
प्रेम वात्सल्य यांची सदैव
आमुच्या घरात वस्ती।।
रात्रंदिन देवघरात
समई तेवत असते
चारी धामांचे दर्शन मला
तिथेच घडत असते।।
दमल्याभागल्यावर
आधार वाटे घराचा
मला मात्र वाटे तो
माझा स्वर्ग सुखाचा।।
माझ्या कल्पनेतले घर
उतरले आहे प्रत्यक्षात
तुम्ही पण,यां नं एकदा
आमुच्या या हसऱ्या घरात।।

सौ.माया सहजे.

